# प्रसिध्दीपत्रक

दिवाणी न्यायालय क.स्तर, कडेगांव या न्यायालयीन इमारतीची दैनंदिन स्वच्छता करणेकामी एक अंशकालिक सफाईगार रोजंदारी तत्वावर नेमणेचा असून, त्यास किमान वेतन अधिनियमातील तरतुदींप्रमाणे वेतन अदा केले जाईल. तरी यासंदर्भात इच्छुक स्थानिक व्यक्तींनी आपले अर्ज मा.दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कडेगांव यांचे नांवे मोहोरबंद लिफाफ्यात दिनांक २१/१०/२०२६ पर्यंत पोहोचतील असे पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करणेत येणार नाही.

सदर इच्छूक अर्जदारांना स्पष्ट समज देणेत येते की, सफाईगारास नियमित शासकीय सेवेत सामावून घेणेबाबतचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही, त्यांची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असेल तसेच कोणतीही पूर्वसूचना व कारण न देता त्यांची सेवा समाप्त केली जाईल. तसेच यासंदर्भातील इतर अटीदेखील लागू राहतील. अंतिम निवड होणा-या उमेदवारास वरील मजकुराचे हमीपत्र सेवेत रुजु होण्यापूर्वी कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल.

दिनांक : ०५/१०/२०२६

**"हुकूमावरुन"**

सही/-

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, सांगली.